- **सुचना/Instructions**

स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) मिळण्यासाठी अटी / शर्ती व सूचना

१) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा यामध्ये प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास स्थलांतर प्रमाणपत्रासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून (website) स्वतः किंवा शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करता येईल.

२) सदर ऑनलाईन अर्ज मंडळाच्या संकेतस्थळावरील विहित नमुन्यातच भरणे आवश्यक राहील.

३) स्थलांतर प्रमाणपत्रासाठी पुढीलप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल व तेऑनलाईन पद्धतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking) भरता येईल.शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे -
* प्रथम प्रतीसाठी – .१००/- + .१०/- क्रिया शुल्क) = रू.११० /-
* द्वितीय प्रतीसाठी - .५००/- + .१०/-(प्रक्रिया शुल्क) = रू.५१० /-

४) एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणासाठी परत मिळणार नाही.

५) स्थलांतर प्रमाणपत्रासाठी करावयाच्या ऑनलाईन अर्जातील सर्व माहिती भरणे अनिवार्य असेल.अपूर्ण माहिती भरलेले अर्ज, कमी शुल्क भरलेले व शुल्क नभरलेले ऑनलाईन अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

६) उत्तीर्ण होऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना स्थलांतर प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

७) स्थलांतर प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करताना पुढील कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.
• शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखाची साक्षांकित प्रत.
• शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखाची साक्षांकित केलेली गुणपत्रिकेची प्रत

८) सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेसह ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतरकार्यालयीन कामाचे ७ दिवसात विद्यार्थ्यास स्थलांतर प्रमाणपत्र देण्यात येईल.

९) सदर प्रमाणपत्र मिळण्यासाठी विद्यार्थ्याला पुढीलपैकी एक पर्याय निवडणे आवश्यक राहील -

(एक) ऑनलाईन / संकेतस्थळाद्वारे –

हा पर्याय निवडल्यानंतर विद्यार्थ्यास सक्षम प्राधिकारी यांनी साक्षांकित केलेली स्थलांतर प्रमाणपत्राची स्कॅन प्रत करून ती त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडी वर व मूळ प्रत त्याने अर्जात नमूद केलेल्या पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येईल.

(दोन) हस्तपोच –

हा पर्याय निवडल्यानंतर विद्यार्थ्यास कार्यालयीन कामाचे ७ दिवसात समक्ष विभागीय मंडळात मिळू शकेल.सदर प्रमाणपत्र फक्त संबंधित विद्यार्थ्यास दिले जाईल.

(तीन) पोस्टाद्वारे -

हा पर्याय निवडल्यानंतर विद्यार्थ्यास स्थलांतर प्रमाणपत्र कार्यालयीन कामाचे ७ दिवसात पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल.

१०) विद्यार्थ्याने आपल्या प्रकरणाची सद्यस्थिती (status) वेळोवेळी संकेतस्थळावर पहावी

११) स्थलांतर प्रमाणपत्र पोस्टाद्वारे पाठविल्यानंतर ते संबंधितास न मिळता गहाळ झाल्यास मंडळ जबाबदार राहणार नाही.

१२) मूळ स्थलांतर प्रमाणपत्र गहाळ झाल्यास द्वितीय प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन पद्धतीने स्वतंत्र अर्ज करावा लागेल व त्यासाठी मुद्दा क्रमांक ०३ प्रमाणे स्वतंत्र शुल्क रु ५१०/-भरावे लागेल.मात्र सदर द्वितीय प्रतीसाठी अर्ज करताना शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला, गुणपत्रक इ.कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती स्कॅन करून पुन्हा अपलोड कराव्या लागतील तसेच विद्यार्थी सूचनांमध्ये दिलेल्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१३) प्रतिज्ञा पत्राचा नमुना डाऊनलोड ऑपशनमध्ये डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे तो डाऊनलोड करून त्याची प्रिंट काढावी तदनंतर ते प्रतिज्ञापत्र पूर्ण भरून ते स्वाक्षांकित करावे व ती प्रत स्कॅन करून अर्जा मध्ये दिलेल्या विकपानुसार अपलोड करावी

१४) विद्यार्थी सज्ञान असल्यास प्रतिज्ञापत्र विद्यार्थ्याने स्वतः सादर करावे मात्र विद्यार्थी अज्ञान असल्यास सदर प्रतिज्ञापत्र त्याच्या पालकाने सादर करणे आवश्यक राहील.

विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक सूचना

१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच्या स्थलांतर प्रमाणपत्रासाठी http://verification.mh.ssc.ac.in या संकेतस्थळाचा वापर करावा

२) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच्या स्थलांतर प्रमाणपत्रासाठी http://verification.mh.hsc.ac.in या संकेतस्थळाचा वापर करावा.

३) विद्यार्थ्याने स्थलांतर प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्जातील माहिती बिनचूक भरावी.अर्ज ऑनलाईन प्रणाली मध्ये submit केल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही.

४) विद्यार्थ्याने तांत्रिक बाबीसंदर्भात अडचणी / शंका असल्यास (support@msbshse.ac.in) या ई-मेल आयडीवर अथवा ०२०-२५७०५२०७/०८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

५) विद्यार्थ्याने ऑनलाईन प्रकीयेद्वारे केलेल्या अर्जाची सद्यस्थिती (status) संकेतस्थळावर पाहता येईल.आपल्या अर्जावरील प्रकिया पूर्ण झाल्यानंतरच आवश्यकता भासल्यास संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.